**(Digital Arrest case)**

**प्रेस नोट** **दि. 17/09/2026**

**बनावट सीमकार्डद्वारे ₹238 कोटींच्या मनी लॉड्रिंग प्रकरणात गुन्हा दाखल झाल्याची भीती दाखवून, सुप्रीम कोर्टाची बनावट नोटीस पाठवत फिर्यादीस 'डिजिटल अरेस्ट'मध्ये ठेवून ₹1.12 कोटींची आर्थिक फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी इंडसइंड बँकेच्या ऑपरेशनल मॅनेजर हेडसह IT क्षेत्रातील वेब डेव्हलपर अशा एकूण 6 आरोपींना जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले.**

नॉर्थ सायबर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर- 186/2026 BNS कलम 204, 308(7), 61(2), 318(4), 319(2), 336(2), 336(3), 338, 340 (2),238 सह IT.Act कलम 66(क), 66(ड) या गुन्ह्यातील बळी पडेलेल्या दहिसर येथील रहिवासी 68 वर्षीय जेष्ठ नागरीक फिर्यादीस दिनांक 30/07/2026 रोजी ते दिनांक 12/08/2026 रोजी दरम्यान व्हॉट्सअॅप व्हिडिओ कॉल करुन स्वतःची ओळख भारतीय दूरसंचार विभागातून बोलत आहे असे भासवुन फिर्यादीच्या च्या सीमकार्डचा वापर करुन त्याचेवर एकुण 238 कोटी रुपयांचा मनी लॉड्रींगचा घोटाळा केल्या बद्दल फिर्यादीच्या विरुद्ध दिल्ली येथे मनी लॉड्रींगचा गुन्हा दाखल झाला आहे या बाबत फिर्यादीस सुप्रीम कोर्टाची नोटीस पाठवुन सदर गुन्ह्यात फिर्यादीस अटक होणार आहे. अशी भीती घालुन फिर्यादीस डिजीटल अरेस्ट मध्ये ठेऊन फिर्यादीची एकुण 1,12,26000/- रुपयांची आर्थीक फसवणुक केली.

अत्यंत संवेदनशील अशा गुन्हयात आरोपींनी स्वतःची ओळख पूर्णपणे लपवून संगनमताने पोलीस अधिकारी असल्याचा बनाव करून, पोलीस गणवेश परिधान करून शासकीय प्राधिकरणे, राष्ट्रीय तपास यंत्रणांचे नावे, शिक्के, लेटरहेड वापरून फिर्यादींना वारंवार अटकेची भीती घालुन व्हीडीओ कॉल करून बँक खात्यातील रक्कमेची फसवणुक केली आहे.

फसवणुकीची रक्कम स्वीकारण्यासाठी सायबर आरोपींनी वेगवेगळया व्यक्तींच्या/कंपनीच्या नावे असलेल्या वेगवेगळ्या बँकेच्या करंट खात्यांची उपलब्धता करून त्यांचा वापर केलेला असुन नॉर्थ सायबर पोलीस ठाणे, मुंबईच्या तपास पथकाने नमुद सायबर गुन्ह्याचा कौशल्यपूर्ण, प्रयत्नात सातत्य राखून सकारात्मक तपास करून आरोपींची गुन्हे कार्यप्रणाली समजुन घेत गुन्ह्यात वापर केलेल्या प्रथम स्तरावरील बँक खात्याच्या आधारे अधिक माहिती घेऊन डिजिटल अरेस्ट गुन्ह्यातील फसवणुकीची रक्कम स्वीकारण्यासाठी करंट बँक खाते खरेदी-विक्री करणारे व फसवणुकीची रक्कम विल्हेवाट लावणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक केली आहे.

- **जप्त मुद्देमाल-** अटक आरोपींच्या ताब्यात 02 लॅपटॉप, 20 मोबाईल फोन, 25 वेगवेगळया इसमाचे बँक अकाउंट्स, ATM कार्डस्, पासबुक, आधार कार्ड्स, असा मुद्देमाल मिळुण आलेला आहे.

- **अटक आरोपी नाव पत्ता व गुन्ह्यातील सहभाग:-**

आरोपी क्र.01 ते 04 यांना दिनांक 21/08/2026 रोजी अटक आरोपी क्र.5 यास दिनांक 24/08/2026 रोजी अटक आरोपी क्र.05 यास दिनांक 29/08/2026 रोजी अटक

1) राजेशकुमार मोहनलाल जैन, वय 54 वर्षे, **शिक्षण 12 वी पास** रा.ठी. 301/ दादासाहेब फाळके रोड, दादर पूर्व, मुंबई **( बँक खातेधारक )**
2) मोहम्मद तारिक अन्वर मोमीन, वय 49 वर्षे, **शिक्षण 12 वी पास**, रा.ठी. 01/ साजन बिल्डिंग, नायगाव क्रॉस रोड, शत्रुंजय टॉवर जवळ, दादर पूर्व, मुंबई **(वेगवेगळ्या इसमांचे बँक अकाउंट काढणारा तसेच बँक खाते पुढे पुरविणारा )**
3) शिखर मुकेश त्यागी, वय 28 वर्षे, **शिक्षण B.com, BMA.** राहणार ठिकाण प्रतीक्षा नगर, सायन, मुंबई **(इंडसइंड बँक ऑपरेशनल मॅनेजर)**

4) गौरव महेश गोयल, वय 40 वर्षे, **BE. IIT. दिल्ली** रा.रहेजा हायट्स, गोरेगाव पुर्व, मुंबई (वेब डेव्हलोपर) , बांद्रा पोलीस ठाणे 115/2021 भा.द.वि.कलम 420,409,120 (ब),34 अन्वये गुन्हा नोंद

5) अजयकुमार कालीप्रसाद शर्मा वय 35 वर्षे **शिक्षण BA.** रा. भिवंडीरोड काल्हेर जि.ठाणे **( मोबाईलद्वारे पुढे ऍक्सेस देणारा)**

**6)** चिंतनकुमार सुरेशभाई देसाई वय 46 वर्षे **शिक्षण- BA.** राहणार SBI बँकेच्या मागे मोराबगल रानदेल रोड सुरत राज्य गुजरात **( मोबाईल बिज्नोर उत्तर प्रदेश येथे घेऊन जाऊन सहकाऱ्यांमार्फत फिर्यादीच्या रक्कमेची विल्हेवाट लावणारा )**

- **गुन्ह्याची पद्धत:-**

गुन्ह्यातील अभय देव गोल्ड प्रा.लि. या कंपनीचा अटक आरोपी क्र.01 डायरेक्टर आहेत. सदर कंपनीस इंडसइंड बँक खाते नोंदणीकृत आहे. नमुद खात्यास अटक आरोपी क्रमांक 01 याचा मोबाईल लिंक आहे तर दुसरे डायरेक्टर यांचा मोबाईल लिंक आहे. अटक आरोपी क्र. 02 याने दादर पुर्व येथील मोबाईल शॉपी मधुन दोन नविन मोबाईल विकत घेतले त्या पैकी एका मोबाईल मध्ये अभयदेव गोल्ड प्रालि.कंपनीचा दुसरा डायरेक्टर याचे नमुद बँक खात्यास लिंक असलेले सीमकार्ड टाकले तर दुसऱ्या मोबाईलमध्ये अटक आरोपी क्र.01 नमुद बँक खात्यास लिंक असलेले सीमकार्ड टाकले दोन्ही मोबाईल अटक आरोपी क्र.02 याने इंडसइंड बँकेचा ऑपरेशनल मॅनेजर हेड अटक आरोपी क्र. 03 याचे ताब्यात दिले. अटक आरोपी क्र. 03 याने नमुद दोन मोबाईल फोन पैकी सदर खात्याचा दुसरा डायरेक्टर याचे बँकेस लिंक असलेले सीमकार्ड मोबाईल फोन स्वतःकडे ठेवुन तो अटक आरोपी क्र. 05 याचे ताब्यात देऊन दिला. तर अटक आरोपी क्र. 01 याचे नमुद बँक खात्यास लिंक असलेले सीमकार्ड मोबाईल फोन मध्ये टाकुन सदरचा मोबाईल फोन अटक आरोपी क्र. 04 (वेब डेव्हलोपर) याचे ताब्यात दिला त्याने तो अटक आरोपी क्र.06 याचे तब्यात दिला.अटक आरोपी क्र. 06 याने मुंबई येथुन विमानाने दिल्ली येथे जाऊन तेथुन बिज्नोर उत्तर प्रदेश येथे त्याचे सहकाऱ्यांच्या मदतीने सदर खात्यावर फिर्यादीच्या बँक खात्यातील रक्कम वर्ग करुन घेऊन फिर्यादीस डिजीटल अरेस्ट या सायबर फ्रॉड प्रकारात एकुण 1,12,26000/- रुपयांची सायबर फसवणुक केलेली आहे.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त ( गुन्हे ) श्री.अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री.कृष्णकांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त श्री. बजरंग बनसोडे, मा. सहायक पोलीस आयुक्त श्रीमती. सुवर्णा शिंदे., वपोनि. प्रमोद कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनिल लोखंडे, सपोनि. सुदर्शन पाटील, पोहवा 041173/ रवी पाटील, पोशि 171089/अक्षय साळवे यांनी पार पाडली आहे.

**नागरिकांना आवाहन:-** डिजीटल अरेस्ट या सायबर फसणुकीपासुन सुरक्षित राहण्याकरिता खालील सुचनांचे पालन करावे.

1. पोलीस/CBI/ED/RBI किंवा कोणतीही शासकीय संस्था डिजिटल अटक करत नाही.
2. कायद्यात डिजिटल अटक अशी कोणतीही तरतूद नाही.
3. अनोळखी व्यक्तींचे व्हिडिओ कॉल स्वीकारू नका अथवा कधीही पैसे पाठवू नका.
4. कुटुंबातील कोणत्याही सदस्यांच्या वागण्यात किंवा मूडमध्ये बदल दिसल्यास त्याकडे लक्ष द्या. जर तुम्ही डिजिटल अरेस्टचे बळी ठरला असाल, तर आपल्या कुटुंबातील सदस्यांना आणि नातेवाईकांना अथवा पोलीसांना त्वरित माहिती द्या.
5. **जर तुम्हाला डिजिटल अटकेबद्दल कोणताही कॉल आला, तर लगेच जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधा किंवा मदतीसाठी 100/1930 या हेल्पलाइन क्रमांकावर कॉल करा किंवा www.cybercrime.gov.in वर तक्रार नोंदवा.**